

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन झाले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. विलास नांदिवडेकर, डॉ. अलोक जत्राटकर आदी.

# विद्यापीठाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाने यंदा जलयुक्त विद्यापीठ या संकल्पनेवर आधारित दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. ही दिनदर्शिका सर्वांना जलसंवर्धनाचा संदेश देईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला. यावेळी दैनंदिनीचे प्रकाशनही झाले.

यंदा विद्यापीठाने केलेल्या जलसंधारणाच्या कामांवर आधारित दिनदर्शिका प्रकाशित केली. शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिका व दैनंदिनीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी आभार मानले. परीक्षा संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता अध्यक्षा डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. के. कामत, डॉ. विजय ककडे, डॉ. अक्षय सरवदे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभा अंत्रेडी आदी उपस्थित होते.

# खेती करो हरी नाम की मनवा



## शिवाजी विद्यापीठात रंगले कबीरपंथीय भजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : खेती करो हरी नाम की मनवा, खेती करो हरी नाम की। पईसा ना लागे रुपिया ना लागे, कवडी न लागे फुटकी।। मन के बैल सुरत पोहावे, रसि लगाऊँ गुरू ग्यान की। कहत कबीरा सुन भाई साधु, भक्ति करो हरीहर की, या संत कबीर यांच्या दोह्यावर आधारित भजन रंगले. मराठी अधिविभागातर्फे सुरू असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत आज सकाळी बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील हिरवळीवर हा कार्यक्रम झाला. आष्टा येथील सद्गुरू भजनी मंडळातील कलाकारांनी हे भजन सादर केले.



**शिवाजी विद्यापीठात रंगलेले कबीरपंथी भजन.**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले.

डॉ.शिंदे म्हणाले,'कबीर आणि तुकाराम यांचा काळ वेगळा असला तरी त्यांची भाषा, वेदना आणि संवेदना एकच आहे. ते दोघेही सर्वसामान्याची भाषा बोलतात आणि सर्वसामान्यासाठी आवाज उठवितात. त्यामुळे त्यांच्याशी जोडले जातो. या दोघांचे हे वैशिष्ट्य व्यक्तिगतरीत्या भावते. महाराष्ट्रात कबीराचे दोहे पारंपरिक पद्धतीने जपले गेले आहेत.'

आष्टा येथील नवनाथ भजनी मंडळाच्या विष्णू आबा थोरात, नारायण गाडगे, भारती मस्के, अजय गस्ती, विजय दत्तू टोमके यांनी तर दुधगाव येथील कबीरपंथी भजनी मंडळाच्या अविनाश कुदळे, भरमू भाऊ गाजी, कृष्णा आंबी, शिवाजी गवळी, मारुती गवळी, धोंडीराम सपकाळ या कलाकारांनी कबीरपंथी तसेच वारकरी संप्रदायातील भजनांचे अत्यंत सुंदर सादरीकरण केले. टाळ, एकतारी, चिपळ्या, हलगी, आणि डिमडी या वाद्यांच्या तालावर भजन रंगले. मराठी अधिविभागातील डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे, उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. वैभव ढेरे, डॉ. पी.बी. बिलावर आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात खांडेकर जयंती

कोल्हापूर, ता. १५ : मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे वि. स. खांडेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे साजरी झाली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी वि. स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ. विलास नांदिवडेकर म्हणाले, ''वि. स. खांडेकर मराठी साहित्यातील थोर लेखक होते. कथा, कादंबऱ्या, लघुनिबंध, निबंध, रूपक कथा अशा विविध लेखनांतून तत्कालीन सामाजिक व राजकीय घडामोडींचे समाजमनावर पडणाऱ्या छायेचे प्रतिबिंब लेखणीतून मांडले. ययाती या कादंबरीला मराठीतील पहिले ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले.'' डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. अशोक चौसाळकर, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : वि. स. खांडेकर जयंतीनिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील त्यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी खांडेकरांना अभिवादन केले.**

# पालकत्वाच्या शिक्षणासाठी महिला सरसावल्या

## बालवाडी शिक्षक अभ्यासक्रमाला यंदा २२५ जणींचा प्रवेश

**» काही सुखद**

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा



> **बालवाडी शिक्षक व शिक्षण या अभ्यासक्रमाचा उद्देश केवळ बालवाडी सेविका बनवणे हा नाही, तर महिला आणि पुरुषांना सुजाण पालकत्वाची जाणीव करून देणे हा आहे. माता-पित्यांनी याचे प्रशिक्षण घेतल्यास त्यांना मुलांची मानसिकता लक्षात येईल.**
> - **डॉ. सुमन बुवा,** प्रभारी संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग.

कोल्हापूर, ता.१५ : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे बालवाडी शिक्षक शिक्षण अभ्यासक्रम घेतला जातो. यंदा या अभ्यासक्रमाला २२५ महिलांनी प्रवेश घेतला आहे. यात सुमारे ५० ते ६० गृहिणी आहेत.

नोकरी, व्यवसायासाठी नव्हे तर मुलांचे पालकत्व चांगल्याप्रकारे करता यावे, यासाठी त्या शिक्षण घेत आहेत. सहा महिन्यांच्या अभ्यासक्रमात मुलांच्या संगोपन कसे करायचे? याचे शास्त्रीय पद्धतीने प्रशिक्षण दिले जाते. गृहिणींचा प्रतिसादही याचा चांगला आहे. नोकरी आणि व्यवसायासाठी शिक्षण हे समीकरण रूढ झाले आहे, मात्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील अभ्यासक्रमांना विद्यार्थी आनंदासाठी किंवा नवीन कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रवेश घेतात. यातील बालवाडी शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमही यापैकीच एक आहे. सहा महिन्यांच्या या कोर्समध्ये मुलांच्या मानसिकतेपासून अनेक गोष्टींची माहिती दिली जाते. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा

**पान २ वर »**

### अभ्यासक्रमातील ठळक मुद्दे

- सहा महिन्यांचा अभ्यासक्रम
- कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांत १२ ठिकाणी अभ्यासक्रम
- लहान मुलांची मानसिकता
- त्यांना शिकवण्याच्या पद्धती
- योग्य आहार आणि वेळा
- निरीक्षणातून मुलांच्या सवयी ओळखणे
- आवाड निवड समजणे
- कृतीतून मुलांना शिस्त लावणे

### ५० ते ६० गृहिणी

यंदा या अभ्यासक्रमाला २२५ महिलांनी प्रवेश घेतला आहे. यात सुमारे ५० ते ६० गृहिणी आहेत. सर्वसाधारणपणे बालवाडीमध्ये सेविका म्हणून नोकरी करता यावी. किंवा स्वतःचे पाळणाघर सुरू करता यावे, या उद्देशाने हा अभ्यासक्रम केला जातो. त्यामुळे पदवीधर तरुणी हा कोर्स करतात, मात्र उच्च शिक्षित किंवा पदवीधर गृहिणींनीही अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आहे. काही महिला ५० वर्षांपेक्षाही जास्त वयाच्या आहेत.

# पालकत्वाच्या शिक्षणासाठी महिला सरसावल्या

» पान १ वरून

अभ्यासक्रम बनवला आहे. या अभ्यासक्रमात विविध शाळांना भेटी दिल्या जातात. वयाच्या ५ ते १२ या वर्षांत मुलांच्या मेंदूचा विकास होत असतो. अशा काळात त्यांच्यावर संस्कार होणे गरजेचे आहे. याचा फायदा त्यांना घरी मुलांचा अभ्यास घेताना होतो. ऑगस्ट ते फेब्रुवारी या कालावधीत हा अभ्यासक्रम जिल्ह्याच्या विविध भागांत घेतला जातो.